# ‘अक्षरफराळा’ला भरभरून प्रतिसाद

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

चकली, लाडू, चिवडा अशा चविष्ट फराळावर ताव मारतानाच अक्षर फराळालाही वाचकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. पुस्तकांच्या दुकानांमध्ये खास दिवाळी अंकांची दालने करण्यात आली असून, आप्तेष्टांना भेट देण्यासाठी वाचक दिवाळी अंक खरेदी करत आहेत.

सध्या तीनशेहून अधिक दिवाळी अंक बाजारात उपलब्ध आहेत.

‘वाचनीय साहित्य, विषयांतील वैविध्य, चालू घडामोडींवर भाष्य अशा विविध कारणांमुळे अंकांना चांगला प्रतिसाद आहे. लहान मुलांसाठीचे अंक, साहित्यिक अंक, एका विषयाला वाहिलेले अंक असे विविध प्रकारचे दिवाळी अंक मिळत असल्याने वाचकांना मोठा पर्याय मिळत आहेत. दिवाळी अंकांमध्ये ‘महाराष्ट्र टाइम्स’, ‘मौज’, ‘मेनका’, ‘माहेर’, ‘अक्षर’, ‘उत्तम अनुवाद’, ‘अनुभव’, ‘अंतर्नाद’, ‘पुण्यभूषण’ अशा दिवाळी अंकांना वाचकांकडून विशेष मागणी आहे. त्याशिवाय यंदा भेट देण्यासाठी दिवाळी अंक घेतले जात आहेत. दोन-तीन प्रतींमध्ये अंकांची खरेदी केली जात आहे,’ अशी माहिती कोथरूड येथील शब्दनाद पुस्तक प्रदर्शनाचे संचालक विनायक धारणे यांनी दिली.

‘वाचकांच्या प्रतिसादामुळेच सांस्कृतिक दिवाळी टिकून आहे. दिवाळी अंकांना खूप चांगला प्रतिसाद मिळतो आहे. दिवाळी अंकांसाठी विशेष योजनाही राबवण्यात आली आहे. एका वेळी पंधरा ते वीस अंक खरेदी करणारेही ग्राहक दिसून येत आहेत. दिवाळी अंकातही वैविध्य आले आहे. ललित साहित्यावर आधारित अंकासह भटकंती, ज्योतिष अशा विषयांवरील अंकांना विशेष मागणी आहे,’ असे मॅजेस्टिक बुक गॅलरीचे संचालक अशोक कोठावळे यांनी सांगितले.

**भेट म्हणून देण्यासाठी दिवाळी अंकांची खरेदी**

## ई दिवाळी अंकांनाही मागणी

दिवाळी अंकांना चांगला प्रतिसाद मिळत असतानाच 'ई अक्षरफराळ'ही तेजीत आहे. बुकगंगा डॉट कॉम या पुस्तकांसाठीच्या पोर्टलच्या माध्यमातून दिवाळी अंक जगभरातील वाचकांना ऑनलाइन स्वरुपातही उपलब्ध आहेत. 'यंदाचे वैशिष्ट्य म्हणजे, ग्रामीण भागातूनही ई दिवाळी अंक डाउनलोड केले जात आहेत. तसेच अमेरिका, इंग्लंड, दुबई, सिंगापूर आदी देशांमधील मराठीजन ई दिवाळी अंक घेत आहेत. आयपॅड आणि लॅपटॉपसह स्मार्टफोनवरही डाउनलोड केले जात आहे,' असे बुकगंगाच्या संचालिका सुप्रिया लिमये यांनी सांगितले.